नि.फौज केस क्र. ३७९/२०२१
निशाणी क्र. ३६

**सरकारतर्फे साक्षीदार क्र.०२ यांची जबानी.**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की -
माझे नांव – दगडुबा तुकाराम तेजनकर
वय सुमारे - ६८ वर्षे व्यवसाय - शेती
राहणार – अंढेरा ता. चिखली
जिल्हा – बुलडाणा

**सरतपासणी सरकारी वकील श्रीमती आर.एस. जाधव यांचेकडून**

पोलीसांनी मला घटनास्थळ तथा जप्तीपंचनामा करण्यासाठी बोलवले नव्हते. पोलीसांनी माझे समक्ष काही जप्त केले नव्हते. पोलीसांनी माझी सही पोलीस स्टेशन येथे घेतली. आता मला अभिलेखावरील घटनास्थळ तथा जप्तीपंचनामा दाखवण्यात आला. त्यात काय मजकूर लिहिलेला आहे हे मला माहित नाही. त्यावर माझी अनुक्रमे ०१ वर सही आहे. सहिस **नि.क्र. ३७** देण्यात येत आहे.

**(सदर साक्षीदार अभियोग पक्षाला पूरक साक्ष देत नसल्याने त्यांना उत्तर सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी सरकारी विधिज्ञांनी मागीतली ती देण्यात आली.**

**उत्तर सुचक प्रश्न सरकारी वकील श्रीमती आर.एस. जाधव यांचे तर्फे**

०२. हे म्हणणे खरे नाही की, दि.०७.०७.२०२१ रोजी सकाळी ११.३० ते १२.३० वा. चे दरम्यान पोलीसांनी मला ग्राम शेलगांव आटोळ येथे आरोपीचे घरासमोर घटनास्थळ तथा जप्तीपंचनामा करण्यासाठी बोलवले होते. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझ्या समक्ष एक अडजात काठी जप्त केली व त्यावर माझी सही घेवून सिलबंद केली. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी घटनास्थळ तथा जप्तीपंचनामा तयार करुन त्यावर माझी सही घेतली. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उत्तरसुचक प्रश्न - संपले.

**आरोपी व आरोपीचे विधिज्ञ श्री टि.ए. शेख यांचा पुकारा केला असता गैरहजर सबब उलटतपास नाही.**

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,

Digitally signed by SMITA HARIDAS UKEY
Date: 2025.12.23 15:22:20 +0530

( श्रीमती एस.एच. उके )
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, चिखली.

दि. २३.१२.२०२५